# बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
### माहिती कक्ष, दि. ०६ ऑक्टोबर २०२५

मा.पोलीस आयुक्तश्री.एम.राजकुमार यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयात धार्मिक स्थळांच्या भोंग्या संदर्भात आज रोजी दिनांक ०६/१०/२०२५ रोजी सकाळी १०.०० वा बैठक आयोजित केली होती.

सदर बैठकीमध्ये मा.उच्च न्यायालयाने क्रिमिनिल रिट पिटीशन नं ४७२९/२०२१ या संदर्भात बेकायदेशीरित्या बसवलेल्या धार्मिक स्थळावरील लाऊड स्पिकर इत्यादी मुळे होणाऱ्या ध्वनी प्रदुषण कायदयाच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्वे जारी केली आहेत.विविध घटकांमध्ये अजूनही मोठया संख्येने बेकायदेशीर लाऊड स्पीकर तसेच परवानगी घेऊन लावण्यात आलेले लाऊड स्पीकरव्दारे ध्वनीप्रदुषण नियमाचे उल्लघन होत असल्याचे निदर्शनास आले आहे या अनुषंगाने महाराष्ट्र पोलीस कायदयान्वये असे बेकायदेशीर तसेच परवानगी असलेले मात्र नियमाचा भंग करणारे लाऊड स्पीकर विरूध्द कारवाई करण्याबाबतचे आदेश देण्याकरीता मा.पोलीस आयुक्त सरांनी आज रोजी बैठक आयोजित केली होती.

सदर बैठकीमध्ये सोलापूर शहर चे काझी अमजद अली काझी,मोहम्मद शफी अहमद काझी जमात ए इस्लीमी हिंद,हसीग नदाफ सचिव जमात उलेमा ए हिंद सोलापूर,मौलाना ताहीर बेग जिलाई जमाम आहले हादिस,मौलाना इब्राहिम काश्मी जुहूरकर,अध्यक्ष जमात उलेमा ए हिंद सोलापूर,मौलाना हरिय सचिव जमात उलेमा ए हिंद सोलापूर शकील मुलवी ट्रस्टी आसार मैदान माजी महापौर आरिफ शेख,मतीन बागवान छत्रपती शिवाजी महाराज मुस्लिम ब्रिगेड,श्री मटके श्री राजशेखर हिरेहब्बू,मानकरी सिध्देश्वर देवस्थान नंदीध्वज श्री शाम कदम पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष संभाजी ब्रिगेड माजी नगरसेवर बाबा मिस्तरी एम आय एम चे जिल्हाध्यक्ष शौकत पठाण श्री अब्दुल्ला डोणगावकर यांच्या सह २०० ते २२० लोक उपस्थित होते.

बैठकीमध्ये श्री हसीब नदाफ यांनी सांगितले की शहर काझी यांचे नेतृत्वाखाली सर्व मुस्लिम जमात यांची बैठक आयोजित केली होती सदर बैठकीत सर्वाचे एकमताने मस्जिदवरील भोंगे काढण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे.आम्ही स्वत:हूनच मस्जिदीवरील भोंगे काढून घेत आहोत.तसेच आपण सोलापूर शहरात डॉल्बी बंद केली त्यांचे आम्ही स्वागत करतो आहे.स्पीकर परवाना हा एक वर्षाकरीता असावा.ज्या व्यक्तीमुळे शांततेस बाधा येत असेल त्यांना आपण मिरवणुकीला,मोर्चाला बाधा येत असलेल तर त्यांना परवानगी देऊ नये असे आमचे मत आहे हा नियम सर्व धर्मियासाठी लागू करावा.त्यानंतर मौलाना मुफती अमजद अली काझी शहर यांनी सांगितले की सोलापूर शहरातील मस्जिदीवरील भोंगे काढण्याच्या संदर्भात आम्ही शासनाच्या नियमांचा पालन करू आमच्यामुळे कोणाला त्रास होणार नाही हे आमची जबाबदारी आहे.कोणीही संविधाना पुढे मोठा नाही ते कोणीही असू देत कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आम्ही नेहमी तुमच्या बरोबर आहोत असे शहर काझी बोलले.

त्यानंतर सर्व लोकांचे विचार ऐकून मा.पोलीस आयुक्त,श्री एम.राजकुमार यांनी मार्गदर्शन केले त्यांनी आवाजाचा डिसेबल किती असावा कायदयाने आपल्याला किती आवाजाची मर्यादित दिलेला आहे हे सांगितले व त्यानंतर त्यांनी सांगितले की तुम्हा सर्वाच्या पुढाकारांनी सोलापूर शहरात आम्ही डीजे मुक्त केलेला आहे यात आमचे श्रेय नाही तुम्हा सर्वाचे श्रेय आहे मा.उच्च न्यायालयाचा आदेश हा कुठल्याही एका विशिष्ट जातीसाठी नसून सर्वासाठी तो आदेश आहे जे लोक डिसेबल पेक्षा जास्त आवाज ठेवतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल सर्व पोलीस ठाणे हद्दीत जे धार्मिक स्तरावरील भोंगे आहेत ही बैठक सूरू व्हायच्या आधीच ९० टक्के लोकांनी काढून घेतलेले आहे.आम्ही पोलीस आयुक्तालयाचे वतीन अभिनंदन करतो उर्वरित लोकंही लवकरच काढून घेतील अशी आपेक्षा करतो.

धार्मिक स्थळांच्या भोंग्यांच्या बैठकीत शहर काझी मौलाना मुक्ती सय्यद अमजद अली काझी यांनी मस्जिद वरील भोगे काढत आहात भोंगे काढणे संदर्भात इतर जातीयांच्या लोकांनाही बैठक घेवून सुचना देण्यात यावे व कारवाई करताना सर्वांना समान कारवाई व्हावी असे सांगितले आहे.मा.पोलीस आयुक्त एम राजकुमार यांनी हिंदू मुस्लिम चा विषय नाही किंवा कुठलाही संघटनेचा आम्हाला दबाव नाही परंतु सुप्रीम कोर्ट व हायकोर्ट च्या आदेशाप्रमाणे आमची ही कारवाई सुरू आहे तुम्ही मनात शंका बाळगू नका आम्ही कारवाई सर्वसामान करत आहोत ज्या भोंग्याचा आवाज ५५ डिसीबलच्या वर आहे.त्यात मस्जिद असो किंवा मंदिर असो आम्ही भोंगे काढून घेत आहोत .सोलापूर शहरात  एकूण ८९३ विविध धर्मोचे धार्मिक स्थळे आहेत

त्या सदर बैठकीस, मा.पोलीस आयुक्त श्री.एम राजकुमार, मा.श्री गौहर हसन, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), मा.श्रीमती डॉ. अश्विनी पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा.श्री. विजय कबाडे, पोलीस उप आयुक्त (परीमंडळ), श्री. पोमण, सहाय्यक पोलीस आयुक्त विभाग-१, श्री. खिरडकर, विभाग-२, श्री राजन माने, गुन्हे शाखा, श्री.खिरडकर, वाहतुक शाखा, सर्व पोलीस ठाणे/शाखा प्रभारी अधिकारी व पोलीस अंमलदार व पत्रकार बंधु उपस्थित होते.

तरी उपरोक्त प्रमाणे बैठकीतील ठळक मुद्यांबाबत आपले लोकप्रिय दैनिकात प्रसिध्दी करुन पोलीस प्रशासनास सहकार्य करावे.